महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

| | |
|---|---|
| दुरध्वनी- ०२५३-२३११२०१/२५७५१०८, फॅक्स- २३११२०१<br>ई-मेल- hfwtcnsk1@gmail.com / hfwtcnsk@gmail.com | जिल्हा रुग्णालय नाशिक आवार, नविन सीबीएस जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक |
| जा.क्र.आकुकप्रकेना/स्व.दरपत्रक/ 5772 /२५ | दिनांक:- १८/०७/२०२५ |


# जाहिर नोटीस (दरपत्रक आमंत्रण पत्र)

## कंत्राटी स्वच्छता सेवा जाहिरात

प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक या कार्यालयातील वसतिगृह, स्किललॅब विभाग, व कार्यालयास मिळालेले इतर प्रशिक्षण हॉल व वसतीगृहा मध्ये स्वच्छता सेवा पुरविणे बाबत एक वर्ष कालावधी करीता करिता दरपत्रके मागविण्यात येत आहे, सदर स्वच्छता सेवेचा अंदाजे वार्षिक खर्च ५ ते ६ लाख आहे. इच्छूक पुरवठाधारकांनी दोन लिफाफा पध्दतीने खालील दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक, जिल्हा रुग्णालय नाशिक आवार, येथे मोहरबंद व्यापारी लिफाफा स्वतंत्र सादर करावे. स्थानिक दरपत्रकधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

(तांत्रिक लिफाफा क्र.१, व्यापारी लिफाफा क्र.२)

**आवश्यक कागदपत्रे -**

१) दरपत्रकफॉर्म मधील परिशिष्ट क्र.१ जोडणे.

२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

३) सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत व संस्थेच्या कार्यक्षेत्राबाबतचे कागदपत्रे जोडणे आवश्यक.

४) मागील तीन वर्षांचे प्राप्ती कर (Income tax) भरल्याचा दाखला. (सन २०२२-२०२३,सन २०२३-२०२४, सन२०२४-२०२५)

५) वैध पॅन कार्ड झेरॉक्स व G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र.

६) राज्य कामगार विमा योजना नोंदणी प्रमाणपत्र हे अधिनियम कलम १(५)नुसार ही योजना २० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या दुकाने, हॉटेल, उपहारगृहे आस्थापनांना लागू करण्यात आली आहे त्यांना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

७) भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र हे ज्या संस्थेत २० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असेल अशा संस्थांना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

८) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र व सन २०२४-२५ वर्षाचे संस्थेचे व्यवसायकर (Professional tax) भरल्याचे चलन अथवा संस्थेचे Professional tax Clearance Certificate जोडावे.

९) संस्थेकडे असलेल्या मनुष्यबळाचा तपशिल सेवानिहाय सादर करावा.

१०) गेल्या तीन वर्षात शासकीय/निमशासकीय रुग्णालयांमध्ये/खाजगी कार्यालय /स्वच्छता सेवा कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडावे व अनुभवाची तपशिलवार माहिती परिशिष्ट क्र.२ प्रमाणे सादर करावीत.

११) दरपत्रकधारकास अथवा संस्थेस रुपये १००/- च्या स्टॅप पेपर वर शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेले नाही,या बाबत परिशिष्ट क्र.३ ॲफिडेव्हिट करुन सादर करणे आवश्यक आहे.

१२) सोबतचे परिशिष्ट क्र.४ नुसार दरपत्रकधारकाची माहिती.

टिप:- कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांचेकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

| अ.क्र. | **संस्थेचे नाव** | **कंत्राटी स्वच्छता सेवेचा तपशिल** | **क्षेत्रफळ चौरस फुट$^{2}$** |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक | १)नविन वसतीगृह पूर्ण इमारत व परिसर,<br>२)रुग्णालय प्रशिक्षण केंद्र नाशिक येथील हॉल व उपहारगृह<br>३)जिल्हा प्रशिक्षण केंद्र नाशिक येथील हॉल व उपहारगृह,<br>४)स्किल लॅब पूर्ण इमारत,<br>५)बचतपुष्प येथिल वसतीगृहातील २ रुम | बांधकाम केलेली जागा १९,३००.३६<br>मोकळी जागा १०,१८९.८९<br>टॉयलेट जागा १,०९२.०० |

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE ★ NASIK ★
सत्यमेव जयते

(डॉ.दावल श्रीहरी साळवे)
प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नासिक

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE * NASIK *

आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
कंत्राटी स्वच्छता सेवा

## अटी व शर्ती

१) स्वच्छतासेवा उक्त आस्थापनेकडून देण्यात येणाऱ्या वेतनाबाबत राज्य शासनाच्या किमान वेतन अधिनियमातील तरतुदीचा भंग झाल्यास किंवा अनुचित कामगार प्रथा अवलंबिली गेल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

२) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांका पासून कार्यालयीन सुट्टी चे दिवस वगळून पाच दिवसात (दि. २८/०७/२०२५ पर्यंत) संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल.उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३) दरपत्रके उघडण्याची दि.२९/०७/२०२५ सकाळी११.३० वा किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

४) दरपत्रक धारकां मार्फत नेमण्यात येणारे स्वच्छता सेवक हे १८ ते ४५ वयोगटातील गणवेशधारी, सशक्त, सुदृढ, शिस्तबध्द, आज्ञाधारक, प्रशिक्षित आणि नेमुन दिलेली जबाबदारी पार पाडण्यास आवश्यक साहित्यासह सज्ज व कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंद नसलेले असावेत.

५) नमुद जबाबदारी पार पाडतांना उद्भवणाऱ्या सर्व कायदेशीर बाबीसाठी पुरवठा धारक/दरपत्रकधारक जबाबदार राहिल.

६) स्वच्छता सेवा व्यवस्था पुरविण्याविषयी करारबध्द झाल्यानंतर कोणत्याही कारणाने शासकीय मालमत्तांचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करणे उक्त आस्थापनेवर बंधनकारक राहील.

७) उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत उक्त आस्थापनेस प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांचेशी रितसर करारपत्र पुरवठा आदेश दिल्यानंतर ८ दिवसाच्या आत पुरवठा आदेशातील अटी मान्य असल्याबाबत रुपये १०० च्या रेव्हेन्यु स्टॅम्पवर लिहून देणे बंधनकारक राहील.

८) करारपत्राचा कालावधी करार केलेपासुन एक वर्षाचा असेल. तसेच सदर काम समाधानकारक असल्याबददल प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर मा.उपसंचालक यांच्या मान्यतेअधिन सदरचा करारास नुतनीकरण/ मुदतवाढ देण्यात येईल. करार कालावधीत उक्त आस्थापनेकडुन करारातील अटी व शर्तीचे उचित पालन होत नसल्याचे निदर्शनास असल्यास ८ दिवसांच्या आंत लेखी सुचना देऊन करार रद्द करण्यात येईल. व अशा परिस्थितीत कंत्राटदाराने जमा केलेली सिक्यूरिटी डिपॉझीट रक्कम जप्त करण्यात येईल.

९) दरपत्रक सुचना व दरपत्रक धारकांना पुरविण्यात आलेल्या सर्वसाधारण सुचनांमध्ये नमुद केलेले नियम दरपत्रकधारकांना बंधनकारक राहील.

१०) स्वच्छतेसाठी लागणारे सर्व साहित्य हे आयएसआय नामांकीत गुणवत्ते नुसार नेमुन दिलेल्या कंत्राटी सफाईगारास वेळोवेळी व पुरेशा प्रमाणात पुरविणे बंधनकारक राहील.

११) कोणतेही कारण न देता निविदेतील अटी व शर्ती मध्ये कोणताही बदल करणे, दरपत्रक स्थगीत/रद्द करण्याचा अधिकार मा.प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांचेकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

१२) स्वच्छता कर्मचारी उपस्थित असताना कोणत्याही वस्तुची चोरी किंवा हानी झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याची परिपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्यामुळे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीची भरपाई कंत्राटदाराचे देयकातून वसूल करण्यात येईल.तसेच आदेशामार्फत पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यास काही ईजा झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारची राहील.

१३) देयक अदा करतांना शासकीय नियमानुसार सर्व करांची वजावट करुन उपलब्ध निधीनुसार देयक अदा करण्यात येईल.

१४) संस्थाधारकास देय असलेली देणी प्रशासकिय अथवा तांत्रिक कारणांमुळे विलंब होत असल्यास सहा महिन्यांपर्यंत संबंधित संस्थेने कार्यरत कर्मचाऱ्यांचे देणी प्रत्येक महिन्याला नियोजित वेळेवर देणे बंधनकारक राहील संबंधित कर्मचाऱ्यांचे देणे वेळेवर न दिल्यास त्यास दरपत्रकधारक (कंत्राटदार) जबाबदार राहतील. सहा महिन्यांपर्यंत कर्मचाऱ्यांचे देणे भागविण्यास सक्षम असल्याबाबतचा बंधपत्र स्टॅम्प पेपरवर कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, नाशिक

१५) कोविड किंवा इतर तत्सम परिस्थिती उद्भवल्यास शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या सुचनांचा पालन करणे बंधनकारक राहील.

१६) आदेश प्राप्त झाल्या नंतर ८ दिवसात प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक या नावाने ३०,०००/-(अक्षरी- तीस हजार रुपये) सुरक्षाठेव रक्कम रकमेचा डिमांड ड्रॉप कार्यालयात जमा करण्यात यावा.

१७) दरपत्रकधारकास असंवैधानिकरित्या दरपत्रक मंजूर करण्याकरीता दरपत्रक समितीवर कुठल्याही प्रकारे दबाव तंत्राचा वापर करणे व तक्रारी करणे इत्यादीचा वापर करता येणार नाही. तसेच राजकीय अथवा अनाठाई हस्तक्षेप करता येणार नाही. दरपत्रकधारक त्यांची दरपत्रक मंजूर करण्याकरीता दबाव कृत्यचा वापर अथवा अनाठाई हस्तक्षेप करीत असल्याची दरपत्रक समितीची खात्री पटल्यास, सदरहू दरपत्रकधारकाची दरपत्रक रदद करुन त्याचे नांव कायम काळया यादीमध्ये टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१८) सेवा पुरवितांना कंत्राटी सेवकास काही हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही यांची सर्व जबाबदारी ठेकेदाराची राहील.

**१९) ✸ आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राची व्याप्ती वाढली, कमी झाली अथवा स्थलांतर झाले तरी दरपत्रक धारकास निश्चित झालेल्या क्वेरफुट च्या दरानुसारच स्वच्छता सेवा पुरविणे बंधनकारक राहिल.**

२०) **स्वच्छता सेवेचे संनियंत्रण-**

खालील सदस्यांची समिती स्वच्छता सेवेची गुणवत्ता पडताळणी दरमहा करेल.

- प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
- साथरोग तज्ञ किंवा व्यवस्थापकीय निर्देशक, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
- प्रशासकीय अधिकारी, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
- कार्यालयीन अधिक्षक, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
- वसतीगृह व्यवस्थापक, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
- कंत्राटदाराचे (ठेकेदाराचे) प्रतिनिधी

२१) **स्वच्छतासेवा कामाची व्याप्ती व स्वरुप**

**अ) स्वच्छता सेवा कामाची व्याप्ती -**

**१) नविन वसतीगृह व परिसर, स्किल लॅब विभाग, जिल्हा प्रशिक्षण केंद्र हॉल-उपहारगृह, रुग्णालय प्रशिक्षण केंद्र हॉल-उपहारगृह, बचतपुष्प येथील २ खोली (इतर संस्थेतील हॉल व खोली मिळाल्यास) स्वच्छ ठेवणे.**

२) वसतीगृह व मुख्य इमारत व इतर सर्व ठिकाणी खिडक्या, पंखे, दरवाजे आठवडयातुन दोन वेळेस स्वच्छता करणे.

३) जुने-नविन वसतीगृह, मुख्य इमारत, स्किल लॅब विभाग व इतर सर्व परिसर दररोज सकाळी ८.०० वाजेच्या आंत स्वच्छता करणे.

४) दिवसातुन तीन वेळेस स्वच्छतागृह स्वच्छ करणे आवश्यक आहेत.(सकाळी ९ वाजता दुपारी १ वाजता व दुपारनंतर ४ वाजता)

५) राष्ट्रीय कार्यक्रम व इतर महत्वाच्या दिवशी सकाळी ७.०० वाजेच्या आंत स्वच्छता करणे.

**ब) कामाचे स्वरुप -**

१) दररोज सकाळी वरिल उल्लेख केलेली इमारत, वसतीगृह, विभाग व परिसर स्वच्छ करावा. तसेच स्वच्छतेबाबत तक्रारी वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक यांचेकडुन घेऊन स्वच्छता करावी व त्यासंबंधी तक्रार निवारण केल्याची स्वच्छता निरीक्षकांची नोंदवही स्वाक्षांकित करुन घ्यावी व नियमित स्वच्छता केल्याचीही नोंदवही स्वाक्षांकित करुन घ्यावी.

२) वरिष्ठांनी केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करुन अंतर्गत व बाहय परिसर नेहमीच स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी.

प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, नासिक

३) कार्यालयाची मुख्य इमारत तसेच वसतीगृह व परिसरातील वस्तु व वाहने व अन्य सामुग्री यांची सुरक्षेची जबाबदारी स्वच्छता कर्मचारी व पर्यायाने संबंधीत संस्थेची असेल.

**क) कंत्राटदाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुरवावयाच्या वस्तु व सुविधा -**

१) स्वच्छतेसाठी लागणारे सर्व साहित्य हे आयएसआय नामांकीत गुणवत्ते नुसार नेमुन दिलेल्या कंत्राटी सफाईगारास वेळोवेळी व पुरेशा प्रमाणात पुरविणे बंधनकारक राहील.

२) स्वच्छता व कर्मचाऱ्यास संबधीत संस्थेचे गणवेश व ओळखपत्र देणे बंधनकारक राहील.

**इ) कंत्राटदारास (ठेकेदारास) द्यावयाचा मोबदला -**

१) कंत्राटदारास (ठेकेदारास) दरमहा देय असलेले देयक अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

२) देयक अदा करताना नियमानुसार आयकर (टि.डी.एस.) कपात करण्यात येईल.

३) देयक सादर करतांना वस्तू व सेवा कर (जी.एस.टी) लावुनच देयक सादर करावे.

४) कंत्राटी कामगार यांच्या कडुन एखादया साहित्यांचे नुकसान झाल्यास ते भरुन देण्याची जबाबदारी संबधित ठेकेदारांची राहील.

**ई) कार्यालयाकडुन ठेकेदारांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीबाबत - स्वच्छतेसाठी पाणी पुरवठा व वीज पुरवठा.**

या शिवाय स्वच्छता सेवांची पहाणी अचानकपणे केव्हाही केली जाईल व त्याबाबतचे अभिप्राय नोंदविले जातील व असामाधानकारक सेवेबाबत लेखी समज देण्यात येईल व कामात सुधारणा न दिसुन आल्यास खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| अ.क्र. | तपशील | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १ | साफसफाई कामाचे वेळापत्रक न पाळणे (प्रतिदिन) | ५००/- |
| २ | असमाधानकारक काम (प्रतिदिन) | १०००/- |
| ३ | साफसफाई साहित्याचा अपुरा पुरवठा (प्रतिदिन) | ५००/- |
| ४ | साफसफाई कर्मचारी यांचे गैरवर्तन (प्रती कर्मचारी प्रतीदिन) | ५००/- |
| ५ | प्रसाधन गृहामध्ये डांबर गोळया न टाकणे (प्रतीदिन) | ५००/- |

२२) कंत्राटदाराच्या सेवा मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास त्या कुठल्याही क्षणी रद्द करण्यात येतील व अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेली हमी रक्कम जप्त करण्यात येईल.

२३) दरपत्रकधारकांनी वरील सर्व अटी आणि शर्तीच्या आधीन राहुन नेमुन दिलेल्या प्रमाणकानुसार स्वच्छता कामाचे दर सर्व करासहीत नमुद करावेत.

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE ★ NASIK ★ सत्यमेव जयते

(डॉ.दावल श्रीहरी साळवे)
प्राचार्य,
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक

# व्यापारी लिफाफा क्र.२

## दरपत्रक

दरपत्रकधारकाचे नावः- ______________________________

संपूर्ण पत्ताः- ______________________________

______________________________

| अ.क्र. | बाब | एकूण क्षेत्रफळ (चौरस फुट) | प्रति महिना प्रति स्केअर फुटसाठी (दर सर्व करा सह) |
|---|---|---|---|
| १ | १)नविन वसतीगृह,<br>२)रुग्णालय प्रशिक्षण केंद्र नाशिक येथील हॉल,<br>३)जिल्हा प्रशिक्षण केंद्र नाशिक येथील हॉल,<br>४)स्किल लॅब येथील हॉल,<br>५)बचतपुष्प येथील वसतीगृहातील रुम | बांधकाम क्षेत्र १९,३००.३६ | |
| | | मोकळी जागा १०,१८९.८९ | |
| | | टॉयलेट जागा १,०९२.०० | |
| | | एकूण | |

**टिप-** सर्व दर हे प्रति महा प्रति स्केअर फुट सर्व करासह नमुद करावे.

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व शिक्का

संपूर्ण नांवः-

पत्ताः-

प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, नासिक

## परिशिष्ट- ०१
## टेंडर फॉर्म (दरपत्रक)

प्रति,

मा.प्राचार्य,
आरोग्य व कुटुंब कल्याण,प्रशिक्षण केद्र,
नाशिक.

महोदय,

दरपत्रक सुचना व कागदपत्रे काळजीपुर्वक वाचल्यानंतर सही करणार आवेदन करतो की,आमच्या स्वच्छता सेवा निविदेचा दर या अर्जासोबत जोडले आहे आणि आमची स्पर्धात्मक ऑफर ही जी या निविदेचा भाग असुन लिफाफा क्र.२ मध्ये सादर केलेली आहे.

आम्ही वचनबध्द आहोत की,जर आमची दरपत्रक स्विकारली गेली तर निविदेतील अटी व शर्तीना अधिन राहुन परिपूर्ण स्वच्छता सेवा देवु.

जर आमची दरपत्रक स्विकारली गेली तर आम्ही वचनबध्द आहोत की,निविदेतील कागदपत्रामध्ये नमुद केलेली सुरक्षा अमानत रक्कम ठराविक मुदतीत जमा करु.

या निविदेला अधिन राहुन आम्ही बांधील आहोत की, निविदेचा वैधता कालावधीपुर्वी कदाचित आमची दरपत्रक स्विकारली अथवा नाकारली जावु शकते.

जोपर्यंत आपल्यामध्ये औपचारीक व अंतिम कंत्राट ठरविले जात नाही.तोपर्यत सदर दरपत्रक ही तुमच्या स्विकृतीसाठी विचाराधीन असणार आहे.आणि तुमच्या स्विकृतीसाठी असणाऱ्या अटी व शर्ती हया कंत्राट करारात नमुद करुन त्या आमच्यावर बंधनकारक राहतील.आम्हाला कल्पना आहे की,जी दरपत्रक तुमच्याकडे दाखल होतील. त्यातील सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक स्विकारण्यास तुम्ही बांधील नाही.

सही :——————————
दिनांक :——————————
दरपत्रकधारकांचे नांवः——————————————

दरपत्रकधारकांची सही शिक्का

प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, नाशिक

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE ★NASIK★
सत्यमेव जयते

## परीशिष्ट - ०२

### मागील तीन वर्षाचा कामाचा अहवाल

सेवा देत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ताः- ______________________________

______________________________

______________________________

| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवा घेत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता | कालावधी | सेवा घेत असलेल्या संस्थेचे अभिप्राय व अनुभवाचे प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

# परिशिष्ट क्र.३

मा.कार्यकारी दंडाधिकारी सा.तह.............................. जि........................ यांचे समोर प्रतिज्ञापत्र लिहून देणार...................................................................................वय.................

धंदा..............................................................................................................................

पत्ता:............................................................................................................................

मी सत्यप्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करतो की,

मी वरील पत्यावरचा कायमचा रहिवासी असून, मा.प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक या आरोग्य प्रशिक्षण केंद्रामध्ये स्वच्छता सेवा पुरविणे या कामाचे दरपत्रक भरली आहे.

मी शासकीय, निमशासकीय, खाजगी कॉन्ट्रॅक्टर कामे घेतली असुन मी ज्या ठिकाणी काम घेतलेली आहे ती कामे व्यवस्थितरीत्या पुर्ण केलेली आहेत. आज पर्यंत कोणतेही काम अपुरे सोडलेले नाही. त्यामुळे अथवा इतर कारणांमुळे शासनाची कुठल्याही विभागामध्ये माझे/ माझ्या संस्थेचे नाव काळया यादीत नाही ही वस्तुस्थिती खरी व बरोबर आहे. माझेवर फसवणूक, अफारातफर, दंडदोष गुन्हा नोंद नाही तसेच मला कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही गुन्हयाखाली शिक्षा केलेली नाही.

तांत्रिक लखोटयामधील (लिफाफा क्र.१) निविदेमध्ये प्रसिध्द केले प्रमाणे आवश्यक ती कागदपत्र मी सादर केलेली आहेत. या बाबत कागदपत्रे अपूर्ण अथवा चुकीची असल्यास माझी दरपत्रक नामंजूर करण्यात येईल याची मला कल्पना आहे. या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. व निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

सदरचे प्रतिज्ञापत्र हे मी किमान वेतन कायद्याचा भंग करणार नाही तसेच मी शासनाच्या कुठल्याही काळया यादीमध्ये समाविष्ट नसल्याबाबत व माझ्यावर कोणत्याही गुन्हा नसल्याबाबत व माझ्यावर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा नोंद नसलेबाबत प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांचे कार्यालयात हजर करणे कामी केले आहे.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असून सत्य आहे. ती खोटी ठरल्यास मी भारतीय दंड संहितेतील कलम १९९, २०० व १९३(२) नुसार होणाऱ्या शिक्षेस व दंडास पात्र राहील म्हणून केले सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट आज म. ..................................

दिनांक

## परीशिष्ट क्रमांक-०४

### दरपत्रक भरणाऱ्या संस्थेची माहीती

१. संस्थेचे नांव/कंपनीचे नांव :______________________________

२. अधिकृत इसमाची सही व हुददा :______________________________

३. संपुर्ण पत्ता :______________________________

४. फोन नंबर/मोबाईल नंबर :______________________________

५. फॅक्स नंबर :______________________________

६. ई-मेल :______________________________

### दरपत्रक भरणाऱ्या संस्थेच्या प्रतिनिधीची माहिती.

१. संपर्क प्रतिनिधीचे नांव :______________________________

२. हुददा :______________________________

३. फोन नंबर :______________________________

४. मोबाईल नंबर :______________________________

५. ई-मेल :______________________________

**प्रतिज्ञापन**

१. मी खालील सही करणार प्रमाणित करतो की,या दरपत्रक फॉर्ममधील अटी व शर्ती पाळण्यास बंधनकारक असुन त्यांचे मी पालन करीन.

२. मी नमुद केलेले दर योग्य असुन संपुर्ण ठेका कालावधीत ते माझ्यावर बंधनकारक राहतील.

३. मी/आम्ही कंत्राटदार मा.प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक कार्यालयातील सक्षम अधिकाऱ्यांना अधिकार देतो की,जर मी/आम्ही कंत्राट करारातील अटी व शर्तीचा भंग केला तर मी/आम्ही दिलेली अनामत सुरक्षा रक्कम सदर अधिकारी जप्त करतील.

४. दरपत्रक कागदपत्रे/दरपत्रक करार निर्देशानुसार सेवा देण्याचे मी/आम्ही वचन देतो.

दरपत्रकधारकाची सही व शिक्का:-
दिनांक - / /
ठिकाण - ____________
हुदद - ____________